नागपूर-नागभीड या ११६.१५ कि.मी. अंतराचा रेल्वे मार्ग नॅरो गेजवरुन ब्रॉड गेज मध्ये रुपांतरीत करण्यासाठी रु.७०८.११ कोटी सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे राज्य शासनाचा ५०% आर्थिक सहभाग देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक - आरएलवाय-०६१२ / प्र.क्र. ७८/१२/पुनर्बांधणी-२/परिवहन-५,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दि. २१ सप्टेंबर, २०१७

वाचा - शासन निर्णय क्रमांक - आरएलवाय-०६१२ / प्र.क्र. ७८ / १२ / पुनर्बांधणी-२ / परिवहन-५, मंत्रालय, मुंबई दि.२३.१.२०१३

प्रस्तावना -

राज्यातील निवडक रेल्वे प्रकल्पांमध्ये राज्य शासनाने काही प्रमाणात आर्थिक सहभाग दिल्यास असे प्रकल्प जलदगतीने मार्गी लागतील ही बाब लक्षात घेऊन नागपूर-नागभीड नॅरो गेज रेल्वे मार्गाचे ब्रॉड गेजमध्ये परिवर्तन करण्याच्या प्रकल्पात ५०% आर्थिक सहभाग देण्याचा निर्णय राज्य शासनाने दि.२३.१.२०१३ रोजी घेतला होता. प्रकल्पाची तत्कालीन अंदाजित किंमत रु.३७६.२१ कोटी व राज्य शासनाच्या सहभागाची रक्कम रु.१८८.११ कोटी होती.

दि.१३.७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये रेल्वे मंत्रालयाने प्रकल्पाचे रु.७०८.११ कोटी रुपयाचे सुधारित अंदाजपत्रक राज्य शासनास अग्रेषित केले आहे व त्यानुसार शासनाच्या हिश्याची ५०% रक्कम उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्याची विनंती केली आहे. नागपूर-नागभीड गेज परिवर्तन प्रकल्पाचे दीर्घकालीन आर्थिक व सामाजिक फायदे लक्षात घेता आणि नक्षल समस्येवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी प्रकल्पाचे महत्त्व लक्षात घेता सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे ५०% आर्थिक सहभागास मान्यता देण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

त्यानुसार दि.१२.९.२०१७ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

२. **शासन निर्णय** -

१) नागपूर-नागभीड या ११६.१५ कि.मी. नॅरो गेज मार्गाचे ब्रॉड गेजमध्ये परिवर्तन प्रकल्पाच्या रु.७०८.११ कोटी खर्चाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

२) प्रकल्पाच्या रु.७०८.११ कोटी सुधारित खर्चापैकी राज्य शासनाची ५०% आर्थिक सहभागाची रक्कम रु.३५४.०५५ कोटी केंद्र शासनास टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम आर्थिक वर्ष २०१८-१९ पासून केंद्र शासनाच्या निधीच्या समप्रमाणात टप्प्याटप्प्याने उपलब्धतेनुसार देण्यात यावी.

४) प्रकल्प खर्चामध्ये भुसंपादनाचा खर्च अंतर्भूत करण्यात यावा.

३. यावरील येणारा खर्च मागणी क्र.बी-७, ३००१ भारतीय रेल धोरण निश्चिती, संचालन, संशोधन व इतर संकीर्ण संघटना, (००) ८०० इतर खर्च (००) (०२) रेल्वे प्रकल्पामध्ये राज्य शासनाचा सहभाग (३००१००५४) ३२ अंशदाने या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७९/१४६१, दि.३०.५.२०१७ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.२०२, व्यय ८, दि.१२.६.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२१११४२३११०२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kranti B. Patil

Digitally signed by Kranti B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ff9761db1faa1460e27b4ede45ea068647125 90bd05d7ff12b360f63975c0187, cn=Kranti B. Patil
Date: 2017.09.21 11:49:33 +05'30'

(क्रांती पाटील)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
६) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७) संबंधित विभागीय सचिव (वित्त, नियोजन व परिवहन विभाग)
८) निवड नस्ती परिवहन-५